GRAVISS
HOSPITALITY
QUALITY·PASSION·INNOVATION

28th August, 2026

To,
BSE Limited,
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street,
Mumbai- 400001.

Scrip Code: 509546

Sub: Newspaper publication regarding Notice of the 65th Annual General Meeting of the Members of the Company scheduled to be held on Wednesday, September 23, 2026 at 12:30 P.M. ("IST")

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we wish to inform you that the Company has published the newspaper advertisement regarding the pre-dispatch of the Notice of the 65th Annual General Meeting of the Company, scheduled to be held on Wednesday, September 23, 2026 at 12:30 p.m. (IST) **through** Video Conference (VC)/Other Audio Visual Means (OAVM).

The said advertisement was published on August 28, 2026. A copy of the newspaper publications is enclosed herewith for your reference and records.

This is for your reference and records.

Thanking You,
Yours Faithfully,

For GRAVISS HOSPITALITY LIMITED

GRAVISS HOSPITALITY LTD.

Jalpa G. Modi
Company Secretary and Compliance Officer.
Encl: As Above

GRAVISS HOSPITALITY LTD.
(FORMERLY KNOWN AS THE GL HOTELS LIMITED)
CIN: L55101PN1959PLC012761
REGISTERED OFFICE: PLOT NO. A/ 4-5, KHANDALA MIDC PHASE II, KESURDI, KHANDALA, SATARA - 412801
ADMIN OFFICE: STRAND CINEMA, 1st Floor, Arthur Bunder Road, Colaba, Mumbai - 400 005.
T 91.22.6251 3131 E: graviss.corporate@gravissgroup.com
www.gravissgroup.com

S&P affirms India rating; outlook stable

SHUBHAM RANA
New Delhi, August 27

S&P GLOBAL Ratings on Thursday affirmed its 'BBB' long-term sovereign credit rating on India, with the fast-growing economy and strong external balance sheet counterbalanced by the government's weak fiscal metrics, high debt stock and low per capita GDP.

High energy prices and challenging agricultural conditions will slow India's GDP growth this financial year, while the central government fiscal deficit is also likely to exceed the Budget target, the rating agency said. Despite a potential fiscal slippage in FY27, S&P expects India to remain committed to fiscal consolidation while maintaining infrastructure investments.

Any erosion of commitment to reducing the fiscal deficit and public debt, or materially slower economic growth, could push India's ratings lower, S&P said. S&P may raise the ratings if fiscal deficits narrow meaningfully such that the net change in general government debt falls below 6% of GDP on a structural basis.

Another global ratings agency, Fitch, earlier this month kept India's sovereign rating at 'BBB-', citing robust growth amid weak fiscal metrics. S&P had upgraded India to 'BBB' from 'BBB-' last year, while Moody's Ratings has kept a 'Baa3' rating on the country since June 2020.

S&P also affirmed the 'A-2' short-term sovereign credit rating on India and kept the outlook on the long-term rating as stable.

"The stable outlook reflects our view that continued policy stability and high infrastructure investment will support India's long-term growth prospects," S&P said. "That, along with stable fiscal and monetary policies that moderate the government's elevated debt and interest burden, will underpin the rating over the next 24 months," the rating agency said.

S&P projects India's GDP growth to slow to 6.6% in the current financial year from 7.7% in FY26, S&P said.

However, solid consumer and public investment dynamics will propel GDP growth to average 7.0% over the next three financial years, S&P said. "These growth rates place India substantially above sovereign peers at similar income levels and should continue to underpin fiscal revenue increases," the rating agency said. S&P's growth forecast for FY27 is a tad lower than the Reserve Bank of India's 6.7% projection. The Indian economy grew 7.8% in the January-March quarter, and April-June is seen at a four-quarter low of 7.2%, according to an FE poll.

Lower rainfall from El Niño and volatile input costs driven by the West Asia war will hurt India's rural economy, S&P said. But services, infrastructure investment and manufacturing will cushion the impact of weak monsoons, the agency said.

India will maintain its strong external position with modest current account deficits (CAD) over the next three years, S&P said. The CAD is seen rising to 1.6% of GDP in FY27 but then slowly moderating to below 1% over the next three years.

Weak fiscal metrics

India's fiscal settings have been the weakest part of its sovereign ratings profile, S&P said. The government has been lowering its fiscal deficit over the last few years, bringing it to 4.4% in FY26 from a high of 9.2% in the pandemic-hit year of FY21. For the current financial year, the government set a fiscal deficit target of 4.3% of GDP in the Union Budget. "However, we expect the impact of an excise duty reduction on fuel along with a potentially higher fertilizer subsidy bill to weigh marginally on the fiscal deficit this year," S&P said.

RATING WATCH

- FY27 GDP growth seen slowing to **6.6%**
- High energy prices, weak agriculture to weigh on growth
- Fiscal deficit may exceed Budget target
- FY27 general government deficit seen at **7.3%** of GDP
- Strong services, manufacturing to cushion farm weakness
- CAD seen rising to **1.6%** of GDP in FY27
- FY27 inflation forecast raised to **5.1%**

Water storage rises as monsoon rains revive

SANDIP DAS
New Delhi, August 27

RESERVOIR STORAGE ACROSS the country rose to about 68% of capacity on Thursday from over 64% a week ago, helped by a revival in monsoon rains.

However, the levels in all 166 major dams was 18% below year-ago levels and 3.74% below the 10-year average, according to the Central Water Commission's weekly bulletin.

Water levels in 47 major dams in southern India stood at 57.34% of combined capacity, marginally up from 56.22% a week ago. However, levels were over 28% below last year and about 13% below the 10-year average.

Storage in 11 major dams in northern India was 30% below last year and 14% below the 10-year average.

Lower storage in the northern and southern regions has been attributed to deficient monsoon rainfall.

Overall monsoon rainfall was 13% below normal as of Thursday. Central India, the rainfed monsoon core zone, was the only region with near-normal rainfall, at 2.1% below the benchmark.

Other regions recorded significant deficits: northwest India (-10.3%), east and north-east India (-27%) and south peninsular India (-22.4%).

Only 45, or 27%, of the 166 dams had more water than a year ago, while 82, or 50%, held more water than the 10-year average.

Storage in 53 major dams in the western region, covering Goa, Gujarat and Maharashtra, was above 80% of combined capacity, supported by adequate rainfall in central India.



ACME Solar raises funds from IIFCL

ACME SOLAR HOLDINGS on Thursday said it has raised ₹1,571 crore project funding from India Infrastructure Finance Company (IIFCL) for setting up ACME Renewtech Sixth 300 MW assured peak power project in Rajasthan.

This project financing, secured at a competitive rate of interest, marks IIFCL's first sole greenfield finance to ACME, with IIFCL acting as the sole lender for the project with a repayment tenor of 19 years, a company statement said.

PTI

२८ ऑगस्ट

शुक्रवार : श्रावण शुद्ध १५, चंद्रनक्षत्र शततारका, चंद्रराशी कुंभ, **चंद्रोदय** सायं. ७.०१, **चंद्रास्त** स. ६.५४, रक्षावंधन, वरदलक्ष्मी व्रत, हिरण्यकेशी तैत्तिरीय श्रावणी, खंडग्रास चंद्रग्रहण (भारतात दिसणार नाही), पौर्णिमा समाप्ती सकाळी ९.४९, भारतीय सौर भाद्रपद ६ शके १९४८.

सूर्योदय ६.१९ **सूर्यास्त** ६.५१

तापमान कमाल २७.२°C किमान २२.३°C

हवेचा दर्जा ६९ (एक्यूआय) समाधानकारक

शेअर मार्केट
SENSEX ७६,९३३.५९ -५३९.३५
NIFTY २४,०१०.८५ -११६.९०
२७ ऑगस्ट २०२६ | १६.००

विनिमय दर
USD 1$: ₹ ९५.५४
EURO 1€ : ₹ १११.२२
POUND 1£ : ₹ १२९.७०

सराफ बाजार
सोने २४कॅरट (प्रति १० ग्रॅम) ₹ १,५८,३८६
चांदी (प्रति १ किलो) ₹ २,३९,५००

क्रीडा सौजन्य : सकाळ स्पोर्टस्
- दुसऱ्या कसोटीत भारतीय संघ विजयापासून वंचित
- महिला आशिया करंडक आजपासून दुबईत
- विजय हुकल्यामुळे शुभमन गिल निराश
- द्रविडसह सेहवागचाही मुलगा भारतीय संघात
- ऑलिंपिकमध्ये निम्म्या खेळांमध्ये सहभागच नाही : मोदी

अंडी : ₹ ५७० (एसईसीसी) शुक्रवारसाठी (प्रति १०० नग)

भटक्या श्वानांचा दोन मुलांवर हल्ला

मलकापुरात आठ दिवसांत दुसरी घटना; नागरिकांमध्ये भीती

मलकापूर, ता. २७ : येथील शास्त्रीनगर येथे श्वानांच्या टोळक्याने दोन लहान शाळकरी मुलांवर हल्ला केला. मात्र, मुलांच्या आजीसह परिसरातील नागरिकांच्या सतर्कतेमुळे दुर्दैवी प्रसंग टळला. काल दुपारी सव्वाबाराच्या सुमारास हा प्रकार घडला. आठ दिवसांत शास्त्रीनगरमध्ये ही दुसरी घटना असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त केला.

संग्रहित छायाचित्र

याबाबत माहिती अशी, शहरातील शास्त्रीनगरमधील रिमांड होम, तसेच गरुड हॉस्पिटलच्या पाठीमागे असलेल्या परिसरात घरातून बाहेर आलेल्या दोन लहान मुलांवर मोकाट श्वानांच्या टोळक्याने हल्ला केला. मोकाट श्वानाचे टोळके आपल्या दिशेने धावत येत असल्याचे बघून सात वर्षांचा मुलाने तेथून पळत घरात गेला. मात्र, केवळ अडीच वर्षांचा मुलगा श्वानाच्या तावडीत सापडला. श्वानाने हल्ला होत असल्याचे लक्षात येताच त्याची आजी धावत आली. त्यांनी आरडाओरडा केला. त्याचवेळी परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेऊन मोकाट कुत्र्यांच्या टोळक्याला तेथून हुसकावून लावले. त्यामुळे चिमुकल्याचा जीव बचावला, तसेच मोठा अनर्थही टळला. यावेळी घाबरलेल्या अडीच वर्षांच्या मुलाला नातेवाइकांनी घरात नेले. बराच वेळ तो मुलगा भीतीच्या छायेखाली होता.

शास्त्रीनगर भागातील रानडे हॉस्पिटल, गरुड हॉस्पिटल, रिमांड होम परिसरात मोकाट श्वानांचा उपद्रव वाढला आहे. ३० ते ३५ मोकाट श्वान या परिसरातील रस्त्यावरून फिरत असतात. त्यामध्येही चार ते पाच श्वान अनेकदा लहान मुलांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रयत्न करतात.

सुमारे आठ दिवसांपूर्वी अशाच प्रकारे मोकाट श्वानांनी लहान मुलावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाला होता. दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यावर स्वच्छता विभागाचे कर्मचारी त्वरित घटनास्थळी पोहोचले. श्वानांना पकडण्यासाठी लागणारे साहित्य व जाळी मागवली आहे. पालिकेच्या पाच ते सहा स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पथक तयार करणार आहे. मोकाट श्वानांपासून नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी पालिका प्रयत्न करत असल्याची माहिती मुख्याधिकारी कपिल जगताप यांनी दिली.

गुन्हे वृत्त

एमआयडीसीतून दुचाकीची चोरी

सातारा : औद्योगिक वसाहतीमधून दुचाकी चोरीला गेली आहे. याबाबत स्वाती दीपक माने (रा. माने कॉलनी, औद्योगिक वसाहत) यांनी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. महिला हवालदार माने तपास करत आहेत.

राजवाड्यावरील जुगार अड्ड्यावर छापा

सातारा : राजवाडा येथील नगरवाचनालयाच्या संरक्षण भिंतीचे आडोशास चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून शाहूपुरी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे. राजेश रामचंद्र काळेकर व विक्रम अनिल जमदाडे (दोघे रा. मंगळवार पेठ) अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्याकडून रोख रक्कम व जुगाराचे साहित्य असा सुमारे ५ हजार ३०९ रुपयांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. हवालदार वैभव शिंदे यांनी ही कारवाई केली आहे.

भीमाबाई नगरमधून दोघे बेपत्ता

सातारा : भीमाबाई आंबेडकर नगर परिसरातील एक जण १३ वर्षांच्या मुलासह बेपत्ता झाला आहे. किरण जयवंत आवळे (रा. भीमाबाई आंबेडकर नगर) व १३ वर्षांचा मुलगा अशी त्यांची नावे आहेत. याबाबत शोभा जयवंत आवळे (रा. भीमाबाई आंबेडकर नगर) यांनी शहर पोलिस ठाण्यात माहिती दिली आहे. महिला हवालदार पाटील तपास करत आहेत.

फसवणुकीप्रकरणी एकावर गुन्हा

सातारा, ता. २७ : विविध प्रकारच्या मिरच्यांचा ४०० पोती माल देण्यासाठी १९ लाख ९३ हजार ७३२ रुपये स्वीकारून माल न देता फसवणूक केल्याप्रकरणी एकावर शाहूपुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ए. के. कुंडगोल दुकानाचे मालक शोएब कुंडगोल (रा. ब्याडगी, कर्नाटक) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याबाबत संतोष सुरेशलाल सारडा (रा. प्रतापगंज पेठ) यांनी शहर पोलिस ठाण्यात फिर्याद नोंदविली आहे. त्यांनी शोएब यांच्याकडे विविध प्रकारच्या मिरच्यांच्या ४०० पोत्यांची मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी ए. के. कुंडगोल दुकानाच्या बँक खात्यावर १९ लाख ९३ हजार ७३२ रुपये आरटीजीएसद्वारे पाठविले; परंतु शोएब यांनी आजपर्यंत मिरच्या दिल्या नाहीत. त्यामुळे सारडा यांनी फिर्याद नोंदविली.

विवाहितेच्या अपहरणाचा बनाव उघड

दहिवडी, ता. २७ : सासरचे लोक माहेरी पाठवत नसल्याच्या रागातून चुलत दिराच्या मदतीने स्वतःच्या अपहरणाचा बनाव रचणाऱ्या विवाहितेचा दहिवडी पोलिसांनी अवघ्या चार तासांत शोध घेऊन या संपूर्ण प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे.

सुरूपखानवाडी (ता. माण) येथील निकिता चंद्रकांत गलांडे (वय २६) ही महिला शेतात गुरांना चारा टाकण्यासाठी गेली असता, काळ्या रंगाच्या गाडीतून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी तिचे अपहरण केल्याची माहिती तिच्या पतीने व सासरच्यांनी दहिवडी पोलिसांत दिली. निकिताच्या अल्पवयीन चुलत दिरानेही पोलिसांना गाडीतून अपहरणाची खोटी कहाणी सांगितली.

घटनेचे गांभीर्य ओळखून सहाय्यक पोलिस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी आणि त्यांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाची पाहणी करत असताना घटनास्थळावरील टायरचे ठसे, रस्त्याची परिस्थिती आणि अल्पवयीन दिराचा जबाब यात तफावत आढळल्याने पोलिसांना संशय आला, तसेच गावातील खबऱ्यांनी निकिता हिला तिचा चुलत दीरच दुचाकीवरून महिमानगडच्या दिशेने घेऊन गेल्याची माहिती दिली. त्यामुळे पोलिसांनी दिराला विश्वासात घेऊन चौकशी केली असता, त्याने वहिनीच्या सांगण्यावरून तिला महिमानगड बस थांब्यावर सोडल्याचे कबूल केले.

तपासाची चक्रे फिरवत पोलिसांनी निकिताच्या माहेरी (बिबवी, ता. जावळी) संपर्क साधला असता ती तिथे सुखरूप पोहोचल्याचे समोर आले. सासरचे लोक माहेरी जाऊ देत नसल्याने पोलिसांना आणि घरच्यांना चकवा देण्यासाठी हा अपहरणाचा बनाव रचला होता, अशी कबुली निकिताने दिली. सहाय्यक पोलिस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी, पोलिस हवालदार सचिन जगताप व रवींद्र खाडे, पोलिस शिपाई अजिनाथ नरबट, नीलेश कुदळे, महेंद्र खाडे, असिफ नदाफ, गणेश खाडे, अजित भोसले व ओंकार साळुंखे यांच्या पथकाने ही कामगिरी केली आहे.

मुख्याध्यापकांना मारहाणीचा पिंपोडेत निषेध

शाळा बंद ठेवून विद्यार्थी, ग्रामस्थांचे वाठार पोलिसांकडे कारवाईची मागणी

पिंपोडे बुद्रुक, ता. २७ : शालेय पोषण आहारासाठी निकृष्ट दर्जाचा भाजीपाला घेण्यास नकार दिल्याच्या कारणावरून येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयातील मुख्याध्यापक ब्रह्मदेव वाघमोडे यांना शिवीगाळ करून मारहाण केल्याच्या घटनेचा विद्यार्थी, ग्रामस्थ व पालकांनी आज शाळा बंद ठेवून निषेध केला.

पिंपोडे बुद्रुक-: सुशीलकुमार भोसले यांना निवेदन देताना रणजित लेंभे. समवेत अशोकराव लेंभे, अमोल निकम, दीपक पिसाळ, वाघमोडे.

या घटनेनंतर आज सकाळी नऊ वाजता विद्यार्थी, ग्रामस्थ, पालक तसेच स्कूल कमिटी सदस्य विद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर एकत्र जमले. यावेळी शाळा बंद ठेवून घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. उपसरपंच रणजित लेंभे, महेश निकम, नारायण सावंत, स्कूल कमिटी सदस्य अशोकराव लेंभे, अमोल निकम, छप्पन साळुंखे, गंगाराम येळे यांनी ही गंभीर व निंदनीय बाब असल्याचे सांगितले. दरम्यान, वाठार पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुशीलकुमार भोसले यांनी घटनास्थळी भेट देऊन संशयित आरोपीवर कायदेशीर कारवाई करण्याचे आश्वासन दिले. यावेळी दीपक पिसाळ, सागर लेंभे, भरत निकम, उद्धव निकम, रामदास निकम, जे. डी. वाघांबरे, राजेंद्र लेंभे, प्रमोद खराडे, संदीप चव्हाण, संजय कदम, बाजीराव लेंभे, सोमनाथ लेंभे, विशाल लेंभे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

माणिक पांढरे यांचे निधन

सातारा, ता. २७ : येथील माणिक बापू पांढरे (वय ९६) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. फुलांचा कार्यक्रम शनिवारी (ता. २९) दौलतनगर येथे होईल. सातारा शहरातील वृत्तपत्र विक्रेते सुधीर पांढरे यांच्या त्या आई होत.

पाचगणीत पत्र्याची दोन शेड हटवली

पाचगणी, ता. २७ : शहरातील प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणि अपघातांचा धोका टाळण्यासाठी पाचगणी पोलिसांनी दोन पत्र्याचे शेड हटवले, तर कित्येक दिवसांपासून रस्त्यावर पडून राहून अपघातांना उघड निमंत्रण देणारी जुनी व भंगार वाहने उचलून रस्ते पूर्णपणे मोकळे केले.

पाचगणी : शेड हटवून रस्ता मोकळा करताना पोलिस.

पाचगणी हे दररोज शेकडो पर्यटकांच्या गाड्यांची वर्दळ असते. मात्र, शहरात टेबल लँड नाका ते राहिल प्लाझा या अत्यंत महत्त्वाच्या मार्गावर गॅरेजच्या नावाखाली अथवा दुरुस्तीच्या बहाण्याने जुनी, नादुरुस्त आणि भंगार वाहने अनेक दिवसांपासून रस्त्यावरच उभी करून ठेवण्यात आली होती. त्यामुळे रस्त्याचा मोठा भाग व्यापला जाऊन अपघातांची शक्यता निर्माण झाली होती. याशिवाय अर्थर रोड परिसरात रस्त्याच्या कडेला उभारण्यात आलेले दोन पत्र्याचे शेडदेखील प्रवाशांच्या व पर्यटकांच्या वाहतुकीत मोठा अडसर ठरत होते.

> दुरुस्तीच्या नावाखाली जुन्या गाड्या, भंगार अथवा वापरात नसलेली वाहने रस्त्यावर पडून राहणे आणि अनधिकृत शेड उभारून वाहतुकीस अडथळा निर्माण करणे हे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही.
> **- दिलीप पवार,** सहाय्यक पोलिस निरीक्षक, पाचगणी.

सहाय्यक पोलिस निरीक्षक दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी आज प्रत्यक्ष मैदानात उतरून धडक कारवाईचा धडाका लावला. आज सकाळीच पोलिसांनी रस्ता अडवणारे ते दोन्ही पत्र्याचे शेड हटवून जागा मोकळी केली, तसेच रस्त्यावर ठाण मांडून बसलेल्या बेवारस व अपघातास आमंत्रण देणाऱ्या वाहनांवर थेट कारवाई करत ती हटवली.

पोलिसांच्या या तत्परतेमुळे टेबल लँड नाका ते राहिल प्लाझा आणि अर्थर रोड परिसरातील मार्ग आता पूर्णपणे मोकळा व सुरक्षित झाला असून, वाहतूक सुरळीत झाली आहे.

सातारा : 'सकाळ'ने पारंगे चौकातील अतिक्रमणांमुळे अपघाताची शक्यता वर्तवली होती. यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने गुरुवारी पारंगे चौक येथील पोलिस कवायत मैदानाकडे जाणाऱ्या डाव्या बाजूकडील प्रशासकीय इमारतीनजीकच्या रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई केली. (**प्रमोद इंगळे :** सकाळ छायाचित्रसेवा)

पोलिस अधिकाऱ्याकडून अल्पवयीन मुलांशी गैरवर्तन

कऱ्हाडातून अधीक्षकांकडे तक्रार

कऱ्हाड, ता. २७ : शहर पोलिस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने मारामारी प्रकरणात ताब्यात घेतलेल्या अल्पवयीन मुलाला अश्लील कृत्य करण्यास भाग पाडले. त्याचे मोबाइलमध्ये चित्रीकरण करीत पैशांची मागणी केल्याचा आरोप एका पीडित मुलासह त्याच्या कुटुंबाने केला आहे.

पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे यांच्यासह बालकल्याण समितीला त्याचे निवेदन दिले आहे. संबंधित पोलिस अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणीही निवेदनाद्वारे केली आहे.

> कऱ्हाडमधून अशी तक्रार आली आहे. त्याची सविस्तर खात्री करून योग्य ती कार्यवाही केली जाईल. असा प्रकार झाला, की नाही यासंबंधी प्रकरणाची व तक्रारीची चौकशी करत आहोत.
> **- निखिल पिंगळे,** पोलिस अधीक्षक, सातारा

दगड मारल्याप्रकरणी महिलेवर गुन्हा

सातारा, ता. २७ : पोलिसात तक्रार दिल्याच्या कारणावरून दगड फेकून मारल्याप्रकरणी एका महिलेवर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अविनाश हरी नामदास (रा. गोडोली) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे.

राजवाडा मंडईतून दुचाकीची चोरी

सातारा, ता. २७ : राजवाडा मंडईच्या पार्किंगमधून दुचाकी चोरीला गेली आहे. याबाबत प्रतीक प्रकाश देवरुखे (रा. डबेवाडी, ता. सातारा) यांनी याबाबत शाहूपुरी पोलिसात फिर्याद दिली.